# डॉ. शंकरराव मुदगल यांचे निधन

**कुरुंदवाड :** हिंदी साहित्याचे गाढे अभ्यासक येथील सहकार भूषण एस. के. पाटील महाविद्यालयाचे माजी उपप्राचार्य डॉ. शंकरराव वसंत मुदगल (वय ७१) यांचे निधन झाले. त्यांनी १९७४ साली येथील सहकार भूषण एस. के. पाटील महाविद्यालयात हिंदी विषयाचे अध्यापक म्हणून सेवेला सुरुवात केली. उपप्राचार्य म्हणून त्यांनी उत्कृष्ट सेवा बजावली आहे. तर हिंदीतून नऊ समीक्षा ग्रंथ प्रकाशित केले आहेत. त्यांचे सात संदर्भकोश व दहा पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेऊन शिवाजी विद्यापीठाने त्यांना



हिंदी विषयातील डि. लिट. ही सर्वोच्च पदवी देऊन सन्मानित केले होते. त्यांच्या कार्याची पोहोच म्हणून त्यांना एक राज्य, तीन राष्ट्रीय, एक आंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. त्यांच्या निधनाने शिक्षण क्षेत्रातील आधारवड काळाच्या पडद्याआड गेल्याने शिक्षण क्षेत्रात शोककळा पसरली आहे.